क्रमांक/यजिप/साप्रवि/परिषद/२११६/०१४
यवतमाळ जिल्हा परिषद, यवतमाळ
(सामान्य प्रशासन विभाग)
यवतमाळ, दिनांक :- १६.०९.२०१४

**प्रति,**

**सन्मा. श्री / श्रीमती -------------------------------------------**

**सदस्य, स्थायी समिती, जिल्हा परिषद, यवतमाळ**

**मुक्काम ----------------------- पोष्ट --------------------**

**तालुका ---------------------- जिल्हाः यवतमाळ.**

**मार्फत :-** **गट विकास अधिकारी, पंचायत समिती ------------------------**

दिनांक ३०.०८.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचा अहवाल आपले माहिती करिता या सोबत पाठविण्यात येत आहे.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

**सचिव,**
**स्थायी समिती**
**जिल्हा परिषद, यवतमाळ.**

**प्रतिलीपी :-**

१] मा.नामदार श्री. ------------------------------------------------------
------------------------------------------- महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर.

२] मा. श्री. -------------------------------------- खासदार / आमदार.
मुक्काम -------------------- पोष्ट -------------- तालुका --------------------
जिल्हा-------------------- यांना माहितीस्तव सविनय सादर.

३] मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, / मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सादर.

४] मा. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. यवतमाळ यांना माहीती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता.

५] ----------------------------------------- जि. प. यवतमाळ (सर्व खातेप्रमुख) यांना माहिती तथा पुढील योग्य कार्यवाहीस्तव रवाना. आपले विभागाशी संबंधीत असलेले विषय, चर्चा व सुचना यावर नियमानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल मा.अध्यक्ष, व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे स्वतंत्ररित्या त्वरीत सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच अनुपालन अहवालाच्या २५ प्रती (विहीत प्रपत्रात) तात्काळ सा.प्र.वि.च्या परिषद विभागाकडे सादर कराव्या.

६] गट विकास अधिकारी, पंचायत समिती ------------------ (सर्व)

****

**दिनांक ३०.०८.१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.**

दिनांक ३०. ०८ . २०१४ रोजी दुपारी १- ०० वाजता स्थायी समितीचे सभागृहात स्थायी समिती सभा घेण्यात आली. सभेला जि. प.चे खालील मा. पदाधिकारी, सन्मा. स्थायी समिती सदस्य, खाते प्रमुख, व आमंत्रीत अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| मा.श्री.प्रविण विनायकराव देशमुख | सभापती. (स्थायी समिती) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ | मा.श्री.सुभाष म. ठोकळ | सभापती, (अर्थ व बांध.) |
| मा.श्री.मनमोहनसिंग अ. चव्हाण | सभापती, (शि व आ.) | मा. श्री.प्रभाकर रा. उईके | सभापती (स.क.स.) |
| मा.सौ. प्राजक्ताताई निमीष मानकर | सभापती, (म.व बा.क). | सन्मा. श्री. राहुल मा. ठाकरे | सदस्य |
| सन्मा. श्री. देवानंद न. पवार | सदस्य | सन्मा. श्री.अनिल भ. नरवाडे | सदस्य |
| सन्मा. श्री. अमन ह. गावंडे | सदस्य | सौ. उमाताई विजय पिदुरकर | सदस्य |
| सौ.संगीताताई अ. राजुरकर | सदस्य | | |
| **आमंत्रीत अधिकारी** | | | |
| श्री.अरुण मोहोड | उप मु. का.अ. (सा.) | श्री. जालींदर पठारे | प्र.उप मु.का.अ.(पं) |
| श्री. आर.जि.बिजवे (प्रति.) | उप मु. का.अ.(म.व.बा.क.) | श्री.सुरेश शहापुरकर | मु.ले.व वि.अ. |
| श्री. एस.एस.तपासे, | का.अ.बांधकाम क्र.१ | श्री. ए.एम.नितनवरे | का.अ.बांधकाम क्र.२ |
| श्री. शि.वा.वद्देवार | कार्य.अभि.(सिंचन) | श्री. के.टी उमाळकर | का.अ.(पा.पु.) |
| डॉ. के.झेड. राठोड | जि.आ.अ. | डॉ. श्री.दिलीप सोनकुसरे | जि.पशु संवर्धन अधि. |
| श्री. पी.पी.देशपांडे | उप अभि. (यां.)भु.स.वि.य. | श्री.जे.आर.राठोड, | कृषि विकास अधिकारी |
| सौ. सुचिता पाटेकर | शि.अ. (प्राथ.) जि.प. यवत. | श्री.एस.जी.वसावे | शि.अ.(माध्य.) |
| श्री. एम.एम. गवई | स.ले.अ. , स.क.स. | श्री.के.एस.मसादे | अधि.अभि.म.वि.विकं. यवत. |
| श्री.अ.वि.सुने (प्रतिनिधी) | जि.ग्रा.वि.यं.यवतमाळ | श्री. ए.वाय. पाटील | उप अभि. PMGSY |
| श्री. व्ही.एच.गावंडे (प्रति.) | का.अ.म.जि.प्रा.यवतमाळ | श्री.मनोज निरंजने (प्रति) | उपसंचालक सा.वनि.वि. |
| श्री. पी.ए. पांडे | कार्य.अभि.म.वि.वि.कं यवत | श्री.आर.आर. खरोडे | वि.अ.(पंचा.) |
| श्री.रा.वा. खेरडे | सहा. आयुक्त, उप आयुक्त कार्यालय पशुसंवर्धन | श्री.ए.एस.मानकर | सहा. ले.अ.वित्त विभाग |
| श्री.सी.बी. उत्तरवार | तं.अ.जि.अधि.कृ.अ.यवत | श्री. विजय पारवानी | स्विय सहा. मु.का.अ. |
| श्री.भानुदास चरडे | स्वियसहा.उप.मु.का.अ.(सा.) | श्री. आर.बी.कोवे | स्विय सहा.सभा.म.व बाक |
| श्री. पी.के.भोंग | स्वि.सहा.मा.अध्यक्ष,जि.प | श्री.एन.पी.कोडगीरवार | क.प्र.अ. सा.प्र.वि. |
| श्री. उत्तम बेजमलवार | स्वि.सहा.सभा. बांध व अर्थ. | श्री. श्रीकांत मडावी | कनि.सहा. सा. प्र. वि. |
| श्री.व्ही.पी.शहाकार | आ.सहा.जि.आ.अ. | | |

सर्वप्रथम सचिवांनी मा. पदाधिकारी व सन्मा.स्थायी समिती सदस्यांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष (स्थायी समिती ) यांचे पुर्वपरवानगीने सभेचे पुढील कामकाज सुरु करण्यात आले.

**विषय क्रं.१ :- दिनांक १/०८/२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालास मंजूरी देणे.**

**सन्मा. सदस्य श्री. अनिल भ. नरवाडे** यांनी मागील सभेत महागांव येथील ग्रामीण रूग्णालय कार्यान्वित करण्याबाबतची कार्यवाही ताबडतोब करावी याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर जि.आ.अ. यांनी ग्रामीण रुग्णालय महागांव येथील आराखडे अंदाजपत्रक तयार करण्याकरिता श्री.मुकेश शर्मा आर्किटेक्चर, औरंगाबाद यांचेकडे, कार्यकारी अभियता, सार्वजनिक बांधकाम विभाग पुसद यांनी जा. क्रं. ३४४०, दिनांक २४/६/२०१४ अन्वये पाठविले आहे. परंतु त्यांचेकडून अंदाजपत्रक आराखडे अद्याप पावेतो अप्राप्त असल्याचे सांगून अंदाजपत्रक आराखडे प्राप्त झाल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर इमारतीचे बांधकाम ७५% पूर्ण झाल्याशिवाय कर्मचारी वर्ग भरण्याची कार्यवाही होणार नाही असे शासन निर्णय दिनांक १७/१/२०१३ अन्वये प्राप्त झाला आहे असी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय यवतमाळ यांनी कळविले असल्याचे सांगितले. यावर कार्यकारी अभियंता बांध.क्रं. १ चे प्रतिनिधी श्री. वाघमारे यांनी अंदाजपत्रक आराखडे बांधकाम विभागाकडे नविन सी. एस. आर. करीता रोखलेली असल्याचे सांगितले. सदर विषयावर चर्चा होऊन मा.अध्यक्ष तथा सभापती (स्थायी समिती ) जि.प. यवतमाळ यांनी बांधकाम-१ विभागाचे कामकाजावर प्रश्नचिन्ह आहे. तरी बांध-१ चे कार्य.अभि. यांना सक्तीने सुट्टीवर पाठवावे व त्यांचे कडील असलेला पदभार श्री. नितनवरे, का.अभि. बांध. क्रं.२ यांचेकडे सुपूर्द करण्यात यावा असे सांगितले.

**मा.सभापती (स.क.स.) श्री. प्रभाकर रा. उईके** यांनी मागील सभेत मौजे बेचखेडा, ता. यवतमाळ येथील म.ग्रा.रो.ह.यो. वृक्षलागवडी मध्ये झालेल्या भ्रष्टाचारा बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर प्रभारी उप मु.का.अ.(पंचा.) तथा गट विकास अधिकारी (म.ग्रा.रो.ह.यो. ) यांनी उक्त प्रकरणा मध्ये सचिव श्री. अमोल चव्हाण यांचेवर निलंबनाची कार्यवाही झाली असून कृषि तंज्ञ (कंत्राटी) श्री. संदीप आगे यांची सेवा मा.जिल्हाधिकारी, कार्यालय यवतमाळ यांचे कडून समाप्त करण्यात आली असल्याचे सांगितले. त्यावर **मा.अध्यक्ष तथा सभापती (स्थायी समिती ) जि.प. यवतमाळ** यांनी उक्त तक्रारीचे अनुषंगाने संबंधितावर कार्यवाही करण्यात आली असल्याने सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा असे सांगितले.

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी मागील सभेत सन २०११-१२ मध्ये जिल्हा नियोजन समिती मधून शाळा दुरूस्ती साठी प्राप्त झालेला निधी रुपये ५ लक्ष शासनाकडे पाठविले असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर मु.ले.व वि.अ, जि.प.यवतमाळ यांनी उक्त प्रकरणी दिनांक १/८/२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती मधील अहवालात मा. सभापती (स्थायी समिती) जि. प. यवतमाळ यांनी दिलेल्या निर्देशानुसार चौकशी करण्यात आली असून निधी खर्च न करण्यास कार्य.अभि. बांध.क्रं. १ हे सर्वस्वी दोषी असल्याचे दिसून येते असे सांगितले. यावर **मा.अध्यक्ष तथा सभापती (स्थायी समिती ) जि. प. यवतमाळ** यांनी उक्त प्रकरणात मु.ले.व वि.अ, जि.प.यवतमाळ यांनी दिलेल्या अहवालाप्रमाणे संबंधितावर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

**सन्मा. सदस्य श्री. राहूल मा. ठाकरे** यांनी मागील सभेत मौजा वाघापूर येथील ग्राम पंचायत सचिव श्री. जगताप यांचेवरील भ्रष्टाचाराच्या आरोपाबाबत ग.वि.अ. राळेगांव यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाचे अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. **त्यावर** प्रभारी उप मु.का.अ.(पंचा.) तथा गट विकास अधिकारी (म.ग्रा.रो.ह.यो. ) यांनी ग्राम सेवकाचा खुलासा प्राप्त झाला असल्याचे सांगून ग.वि.अ. चा अभिप्राय आलेला नसल्याने या प्रकरणात ग.वि.अ. कडून अभिप्राय मागविण्यात आला आहे. अभिप्राय प्राप्त झालेवर पुढील कार्यवाही केली जाईल असे सांगितले **असता सन्मा. सदस्य यांनी** चौकशी अहवालात त्यांचेवरील कांही आरोप सिध्द होत असताना देखील अद्याप कार्यवाही करण्यात आली नाही ही बाब प्रशासनाचे दृष्टीने खेदजनक असल्याचे सांगून उक्त प्रकरणात त्वरीत कार्यवाही करण्यात यावी असे सांगितले. यावर **मा.अध्यक्ष तथा सभापती (स्थायी समिती )जि.प.यवतमाळ** यांनी उक्तप्रकरणात सत्वर कार्यवाही करुन पुढील सभेत अहवाल सादर करण्याबाबतचे **निर्देश उप मु.का.अ. (पंचायत ) यांना दिले.**

**सन्मा.सदस्य.श्री.देवानंद न .पवार** यांनी मागील सभेत एस.सी.समाजाच्या लोकांना शौचालयासाठी त्यांचा वाटा मागील दोन वर्षाचा कालावधी होऊन मिळाला नसल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. **त्यावर** कार्य.अभि. (पा.पु.) श्री. उमाळकर यांनी पं. स. घाटंजी कडील मागणी ५ व्या महिन्यात आली, आपण तिस-या महिन्यापर्यंत सर्वांना निधी दिला. त्यामुळे डिसेंबर मध्ये निधी आल्यानंतर त्यांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल असे सांगितले.

**सन्मा.सदस्य.श्री.अनिल भ.नरवाडे** यांनी मागील सभेत महागांव पं. स.अंतर्गत ग्रा.पं.ला लावण्यात आलेले सौर पथदिवे बंद स्थितीत असल्याने सौर पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती कोणांकडे आहे याची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. **त्यावर** प्रभारी उप मु.का.अ.(पंचा.) तथा गट विकास अधिकारी (म.ग्रा.रो.ह.यो. ) यांनी सौर पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती कंपनीकडे दिलेली असल्याचे सांगितले असता **मा.अध्यक्ष** यांनी याबाबत तिव्र नाराजी व्यक्त करुन एक महिन्यानंतर विषय येणार असतांना माहिती देण्यात येत नाही, ही बाब बरोबर नसल्याचे सांगून पुढील सभेमध्ये माहिती देण्याबाबतचे **निर्देश उप मु.का.अ.(पंचा.)** यांना दिले.

**ठराव क्रं. १ :- दिनांक १/८/२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालास ही सभा मंजूरी प्रदान करते.**

**विषय क्र २ :- शासन आदेश व परिपत्रकाचे वाचन करणे.**

उप मु. का. अ. (पंचा.) यांनी राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान (RGPSA) लोकप्रतिनिधी / अधिकारी /कर्मचारी यांच्या क्षमताबांधणी प्रशिक्षणाच्या मार्गदर्शक सूचना बाबत म.शा. ग्रा.वि. व जलसंधारण विभाग मुंबई,शा.परि.क्र. संकीर्ण -२०१४ /प्र.क्र.६७/ योजना-४, दिनांक २० मे २०१४ चे वाचन केले.

**विषय क्र.३ :- जिल्हा ग्राम विकास निधी माहे जुलै- २०१४ मध्ये झालेल्या जमा खर्चास मंजुरात देणेबाबत.**

विषयाची माहिती उप मु. का. अ. (पं.) यांनी सभेत दिली. जिल्हा ग्राम विकास निधीच्या जमा खर्चास महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १३६ अन्वये स्थायी समितीची मंजूरात घेणे आवश्यक आहे. माहे जुलै -२०१४ पर्यंत प्राप्त झालेल्या जमा खर्चाचे विवरण मंजूरीकरीता खालीलप्रमाणे सादर करण्यांत येत आहे. कृपया प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात यावी ही विनंती. **सदर विषयावर चर्चा होऊन मा. सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी खालीलप्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र. २ :- मुंबई ग्रा.प.अधिनियम १९५८ चे कलम १३६ अन्वये जि. ग्रा.वि.निधी माहे जुलै - २०१४ मध्ये झालेल्या जमा खर्चास ही सभा खालील प्रमाणे मंजुरी प्रदान करते.**

| | | |
|---|---|---|
| १ | महिण्यातील सुरवातीची शिल्लक | **१०,१६,००,६८८.४१** |
| २ | महिण्यातील जमा | **०,०१,०७,५०३.००** |
| ३ | एकुण जमा रक्कम रुपये | **१०,१७,०८,१९१.४१** |
| ४ | महिण्यात झालेला खर्च रक्कम रुपये | **निरंक** |
| ५ | महिना अखेर शिल्लक रक्कम रुपये | **१०,१७,०८,१९१.४१** |

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्रं. ४ :- जिल्हा ग्राम विकास निधीच्या बचत खात्यांत एकूण रु. ४७,५८,१८२.४१/रु. जमा असलेल्या रक्कमेपैकी रु.४७,५०,०००/-फक्त (अक्षरी सतेचाळीस लाख पन्नासहजार हजार फक्त )दोन वर्षाचे मुदतीकरीता मुदत ठेव योजनेत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यवतमाळ येथे गुंतवणूक करण्याबाबत.**

विषयाची माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी सभेत दिली. सध्या स्थितीत माहे जूलै २०१४ अखेर जिल्हा ग्राम विकास निधीचे खात्यात खालील प्रमाणे रक्कम शिल्लक आहे.

| अ.क्र | तपशिल | शिल्लक रक्कम |
|---|---|---|
| १ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यवतमाळ खाते क्र.०००१ मध्ये जमा | **४७,५८,१८२.४१** |
| २ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यवतमाळ येथे ३ वर्षाकरीता पुर्नगुंतवणूक केलेली आहे. पावती क्र.०२४१५७ दि.१५-११-०१२ ते दिनांक १५-११-२०१५ व्याजाचा दर ८.५०% | ४,८९,०१,६३७.०० |
| ३ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यवतमाळ येथे दोन वर्षाकरीता मुदत ठेवीत गुंतवणूक केलेली आहे. पावती क्र. २४७०२६ दि.२२-६-०१३ ते दिनांक २२-६-२०१५ व्याजाचा दर ९% | **१,७३,९८,८३७.००** |
| ४ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत २ वर्षाकरीता मुदत ठेवित रक्कम गुंतवणूक करण्यात आलेली आहे. पावती क्र. ००००७७८ दि.५/५/२०१३ ते दि.५/५/२०१५ व्याजाचा दर १०% | **१,७७,००,०००.००** |

| | | |
|---|---|---|
| ५ | जिल्हा मध्यर्ती सहकारी बँकेत २ वर्षाकरीता मुदत ठेवीत रक्कम गुंतवणूक करण्यात आलेली आहे. पावती क्र.००६४३४९ दिनांक ७/१/२०१४ ते दि.७/१/२०१६ व्याजाचा दर १०.५०% | ५९,४९,५३५.०० |
| ६ | जिल्हा मध्यर्ती सहकारी बँकेत २ वर्षाकरीता मुदत ठेवीत रक्कम गुंतवणूक करण्यात आलेली आहे. पावती क्र.००००२१० दि. १३/२/०१३ ते दि.१३/२/२०१५ व्याजाचा दर १०.% | ७०,००,०००.०० |
| | **एकुण** | **१०,१७,०८,१९१.४१** |

वरीलप्रमाणे जूलै २०१४ अखेर एकुण **१०,१७,०८,१९१.४१** रुपये निधीत शिल्लक असून त्या पैकी बचत खाते क्र.०००१ मध्ये ४७,५८,१८२.४१/- रु.जमा आहे. बचत खात्यांत जमा असलेल्या रक्कमेपासून योग्य उत्पन्न मिळेल या दृष्टीकोनातून गुंतवणूक करण्याबाबत शासन परिपत्रक व्हीपीएम २६०१/प्रक्र १६४३/२२ मुंबई ३२ दि.१६/५/२००२ चे परिपत्रानुसार जि.ग्रा.वि.नि.मधील सर्व रक्कम बचत खात्यांमध्ये न ठेवता जास्तीत जास्त रक्कम गुंतवणूक करण्यांत यावी असे नमूद असून कोणत्याही पंचायत समितीकडून ग्रामपंचायतीची तुर्त कर्जाची मागणी नसल्यामुळे रु.४७,५०,०००/-**फक्त( अक्षरी सतेचाळीस लाख पन्नास हजार रु.फक्त )** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मुख्य शाखा यवतमाळ येथे दोन वर्षाचे मुदतीकरीता गुंतवणूक करण्याचे प्रस्तावित असून सदर विषयाचे प्रस्तावाला तुर्त स्थायी समितीचे सभेत मंजूरी घेऊन त्यांस पुढील होणा-या जिल्हा परिषद सर्व साधारण सभेची मंजूरी करीता सादर करण्यांत येईल. तरी सदरहू विषय स्थायी समितीचे सभेत मंजूरीस्तव सविनय सादर करण्यात येत आहे. कृपया प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात यावी ही विनंती. **सदर विषयावर चर्चा होऊन मा. सभापती (स्थायी समिती) यांनी खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.**

**ठराव क्रं. ३ :- उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे व शासन परिपत्रक व्हीपीएम २६०१/प्रक्र १६४३/२२ मुंबई ३२ दि.१६/५/२००२ चे परिपत्रानुसार जिल्हा ग्राम विकास निधीच्या बचत खात्यांत एकुण रु. ४७,५८,१८२.४१/- जमा असलेल्या रक्कमेपैकी रुपये ४७,५०,०००/- फक्त (अक्षरी सतेचाळीस लाख पन्नासहजार हजार फक्त ) दोन वर्षाचे मुदतीकरीता मुदत ठेव योजनेत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यवतमाळ येथे गुंतवणूक करण्यास जिल्हा परिषद सर्व साधारण सभेची मंजूरी प्राप्त होणेकरिता ही सभा शिफारस करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**<u>--मा. अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय --</u>**

**विषय क्रं. ५ :- शाळा इमारत निर्लेखित करणेबाबत. (इमारत पाडणेबाबत.) पं.स. यवतमाळ मधील जामवाडी येथील शाळेच्या वर्गखोल्या निर्लेखीत करणेबाबत.**

विषयाची माहीती शि.अ. (प्राथ.) यांनी सभेला दिली. पंचायत समिती, यवतमाळ अंतर्गत जामवाडी येथील शाळेच्या ०१ वर्गखोल्या निर्लेखीत (ईमारत पाडणे) करणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावास उपअभियंता जि .प. बांधकाम उपविभाग, यवतमाळ यांनी शाळा वर्गखोल्या पाडणेकरीता रु. २६, ८९०/- या प्रमाणे मान्यता दिली आहे. तेव्हा सदर वर्ग खोल्या निर्लेखीत करण्याकरीता प्राकलनास मंजुरीस्तव विषय स्थायी समितीचे सभेसमोर ठेवण्यात येत आहे. कृपया मंजुरी प्रदान करण्यात यावी ही विनंती. सदर विषयावर **चर्चा होऊन मा. अध्यक्ष यांनी** सभागृहाचे संमतीने खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**<u>ठराव क्र.४ :-</u> पंचायत समिती, यवतमाळ मधील जामवाडी येथील जि.प.प्राथमिक शाळेच्या ०१वर्ग खोल्या निर्लेखीत (ईमारत पाडणे) करणेबाबतच्या प्रस्तावाचे प्राकलनास ही सभा खालीलप्रमाणे मंजुरी प्रदान करते.**

| **अ.क्र.** | **शाळेचे नाव** | **पं.स. चे नाव** | **खोल्यांची संख्या** | **उप अभियंता जि.प.बांधकाम उप वि.दारव्हा यांनी प्राकलीत केलेली रक्कम.** |
|---|---|---|---|---|
| १ | जि.प. प्राथमिक शाळा जा यवतमाळ | यवतमाळ | ०१ | २६,८९०/- |

**ठरावावर कोणतीही उपसूचना आली नाही, व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र.०६:- विशेष घटक योजना ०२ दुभत्या जनावरांच्या गटाचा पुरवठा करणे. सन २०१४-१५ या बाबीकरिता रुपये ३४.०२ लक्ष(रुपये चौतीस लक्ष दोन हजार फक्त) चे खर्चास प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

विषयाची माहिती जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.यवतमाळ यांनी सभेत दिली. विशेष घटक योजना,०२ दुभत्या जनावराच्या गटाचा पुरवठा करणे, सन २०१४-१५ या बाबी करिता खात्यामार्फत रुपये २५.५२ लक्ष ची तरतूद प्राप्त झाली असून सदर तरतूदीमधून अनुसुचित जातींच्या लाभार्थ्यांना ७५ % अनुदान व २५ % लाभार्थी हिस्सा/वित्तीय संस्थांचे कर्जावर दुधाळ जनावरांच्या गटाचे वाटप करावयाचे आहे.

खात्याच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सदर योजना राबविताना प्रत्येक लाभार्थ्यांस ०२ जनावरांचा गट याप्रमाणे वाटप करावयाचे असून प्रती संकरीत गाय/म्हैस किंमत रुपये ४०,०००/- याप्रमाणे ०२ जनावरांची किंमत रु.८०,०००/- व ५.७५ टक्के + १०.०३ टक्के सेवादराने तीन वर्षाचा विमा रुपये ५,०६१/- या प्रमाणे एकूण रुपये ८५,०६१/- चे मर्यादेत ७५ % अनुदान रुपये ६३,७९६/- व २५ % लाभार्थी हिस्सा /वित्तीय संस्थांचे कर्ज रुपये २१,२६५/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर योजनेवर ७५ टक्के अनुदान तरतूद रुपये २५.५२ लक्ष व २५ टक्के लाभार्थी हिस्सा/वित्तीय संस्थांचे कर्ज रुपये ८.५० लक्ष असे एकूण रुपये ३४.०२ लक्ष (रुपये चौतीस लक्ष दोन हजार फक्त) खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१२/प्र.क्र./६८०/वित्त-९ मंत्रालय मुंबई दिनांक ३१ जानेवारी २०१३ नुसार प्रशासकिय व वित्तीय मंजूरी प्रदान करण्यास स्थायी समिती सभा सक्षम आहेत.

सबब रुपये ३४.०२ लक्ष (रुपये चौतीस लक्ष दोन हजार फक्त) चे खर्चास प्रस्ताव प्रशासकिय मंजूरीस्तव सविनय सादर. कृपया प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात यावी ही विनंती. विषयाचे अनुषंगाने खालील प्रमाणे सविस्तर चर्चा करण्यात आली.

**सन्मा.सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी ज्यांच्याकडे जुनी जनावरे चांगल्या स्थितीत व जीवंत आहेत, याची खात्री करूनच नंतर त्यांना नविन जनावरे वाटप करण्यात यावी असे सांगितले असता **मा.अध्यक्ष** यांनी संबंधीत गावातील ग्रा.पं.मध्ये सरपंच, ग्राम पंचायत सदस्य व सन्मा.जि.प.सदस्यांना बोलावून जनावरांचे वाटप करावे व वाटपाचे वेळी फोटो काढण्यात यावे व ते सादर करण्याबाबतचे **निर्देश जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना दिले.**

**सदर विषयावर चर्चा होऊन मा. अध्यक्ष यांनी** सभागृहाचे संमतीने खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्रं. ५ :- महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१२/प्र.क्र./६८०/वित्त-९ मंत्रालय मुंबई दिनांक ३१ जानेवारी २०१३ नुसार विशेष घटक योजना ०२ दुभत्या जनावरांच्या गटाचा पुरवठा करणे. सन २०१४-१५ या बाबीकरिता रुपये ३४.०२ लक्ष (रुपये चौतीस लक्ष दोन हजार फक्त) खर्चाचे प्रस्तावास ही सभा प्रशासकिय मंजूरी प्रदान करने.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र. ७ :-साप्ताहीक. ग्रामसत्ता यवतमाळ** या क वर्ग वृत्तपत्रास सामान्य प्रशासन विभाग,

जि. प. यवतमाळकडे ठेवण्यात आलेल्या शासनमान्य वृत्तपत्राचे रोटेशन यादीत समाविष्ट करणेबाबत. उपसंचालक (माहीती) विभागीय माहीती कार्यालय अमरावती यांचे पत्र क्र.विमाका/अम/दर.वा/श्रेणी.वा. /२०१४/५७५, दिनांक २४-फेबुवारी-२०१४ नूसार, शासन निर्णय पीयूबी-२०१४/प्र.क्र./५३/३४ दि. २४ फेब्रुवारी २०१४ अन्वये यवतमाळ येथुन प्रकाशीत होणा-या **साप्ताहीक ग्रामसत्ता यवतमाळ** या **वृत्तपत्रास" क "वर्गात समाविष्ट करण्यात आले असून सदर वृत्तपत्राचा जाहीरातीचा दर प्रती चौ.से.मी.रु.७/- (अक्षरी रु. सात फक्त) निश्चीत करण्यात** आला आहे.

तसेच जिल्हा माहीती अधिकारी, यवतमाळ, यांनी साप्ताहीक ग्रामसत्ता, यवतमाळ, हे वर्तमानपत्र शासन निर्णय क्रमांक पीयुबी -२०१४/प्र.क्र./५३/३४ दिनांक २४ फेब्रुवारी २०१४ नुसार,शासनमान्य यादीत समाविष्ट करण्यात आले असून सदर साप्ताहीकाचा खप ११०० इतका असून साप्ताहीक कार्यालयात नियमीत प्राप्त होते. करिता साप्ताहीक ग्रामसत्ता, यवतमाळ, शासनाच्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेच्या यादीत समाविष्ट करण्यास हरकत नाही,

अशी शिफारस त्यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र दिनांक २ जून- २०१४ नुसार केलेली आहे. करिता **साप्ताहीक ग्रामवार्ता, यवतमाळ,** हे वृत्तपत्र यवतमाळ जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे ठेवण्यात आलेल्या वृत्तपत्राचे रोटेशन रजिष्टरमध्ये जिल्हास्तरीय साप्ताहीक **" क "** वर्गाचे यादीत अनुक्रमे २९ या क्रमांकावर समाविष्ट करणेबाबत, सदरचा विषय मंजूरी करिता मा.स्थायी समिती, समक्ष मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. **सदहू विषयावर खालील प्रमाणे चर्चा घडून आली.**

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी सदहू वृत्तपत्राचा खप किती आहे व वृत्तपत्राच्या किती आवृत्ती निघतात या बाबतची माहीती तसेच अंकाचे आवृत्तीसह विषय पुढील सभेत ठेवण्यात यावा असे सांगितले. **यावर मा.सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी सन्मा.सदस्यांनी सूचविल्या नुसार साप्ताहीक ग्रामसत्ता यवतमाळ या " क " वर्ग वृत्तपत्रास जि. प. यवतमाळकडे ठेवण्यात आलेल्या शासनमान्य वृत्तपत्राचे रोटेशन यादीत समाविष्ट करणेबाबतचा विषय अद्यावत माहितीसह पुढील सभेमध्ये सादर करण्याबाबतचे **निर्देश सचिव तथा उप मु.का.अ.(सा) जि.प.यवतमाळ यांना दिले.**

**विषय क्रं.८ :- तिथेक्षेत्र विकास योजना सन २०१४-१५ अंतर्गत चिंतामणी देवस्थान कळंब ता.कळंब येथे भक्त निवास शेड बांधकामास प्रशासकिय मंजूरी बाबत.**

विषयाची माहिती कार्य.अभि. बांध. क्रं. १ यांनी सभेत दिली. तिथेक्षेत्र विकास योजना अंतर्गत चिंतामणी देवस्थान कळंब ता.कळंब येथे भक्त निवास शेड चे बांधकामास रुपये ३५.०० लक्ष चे प्राकलन प्रशासकिय मंजूरी करिता प्राप्त झाले आहे.

ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीओ- २०१२/ प्र.क्र.६८०/वित्त- ९, मुंबई दिनांक ३१/१/२०१३ अन्वये जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता १९६८ (नियम -४ खालील) परिशिष्ट २ नुसार रुपये ३५.०० लक्ष चे कामास जि.प.स्थायी समिती प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्यास सक्षम आहे.

तरी चिंतामणी देवस्थान ता.कळंब येथे भक्त निवास शेड बांधकाम रुपये ३५.०० लक्ष चे कामास प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याकरिता सदर प्रस्ताव जि. प. स्थायी समिती सभेमध्ये सादर करण्यात येत आहे. कृपया प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात यावी ही विनती. **सदर विषयावर चर्चा होऊन मा. अध्यक्ष यांनी** सभागृहाचे संमतीने खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र.६ :- ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीओ- २०१२/ प्र.क्र.६८०/वित्त- ९, मुंबई दिनांक ३१/१/२०१३ अन्वये जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता १९६८ (नियम -४ खालील) परिशिष्ट २ नुसार तिथेक्षेत्र विकास योजना सन २०१४-१५अंतर्गत चिंतामणी देवस्थान कळंब ता. कळंब येथे भक्त निवास शेड रुपये ३५.०० लक्ष चे बांधकामास ही सभा प्रशासकिय मंजूरी प्रदान करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्रं.९ :- ग्रामपंचायत मुडाणा ता. महागाव चे विभाजन करुन साधुनगर येथे नविन ग्रामपंचायत स्थापन करणे बाबत.**

विषयाची माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी सभेत दिली. गट विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती, महागांव यांचे पत्र क्रं पंसम / ग्रापं /१७७५/२०१४, दिनांक २१/६/२०१४ अन्वये यवतमाळ जिल्हयातील पंचायत समिती, महागांव अंतर्गत असलेल्या ग्रा. पं. मुडाणा या ग्रामपंचायतचे विभाजन करुन त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी नविन ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. तपशिल पुढील प्रमाणे आहे.

शासन निर्णय क्रमांक/व्हीपीएम/२६०३/प्र.क्र.१५४४/पंरा-४(२२) दिनांक १२ फेब्रुवारी २००४ अन्वये ज्या महसुली गावी, स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करावयाची असेल, त्या गावांची लोकसंख्या कमीत कमी २००० असणे आवश्यक आहे. केवळ अपवादात्मक प्रकरणात (उदा. आदिवासी व तांडा या भागांसाठी किंवा दोन गावात जर तीन कि.मी. पेक्षा जास्त अंतर असेल) तर त्या भागाकरीता किमान लोकसंख्या १००० असणे आवश्यक आहे.

तेंव्हा वरील प्रमाणे ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबत गट विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती, महागांव यांचे कडुन प्रस्ताव प्राप्त झाल्याने शासन निर्णयान्वये यवतमाळ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हा प्रस्ताव जिल्हा परिषदेचे स्थायी समिती समोर ठेवुन त्यांचे काही अभिप्राय असल्यास ते नोंदवुन मा. आयुक्त अमरावती विभाग, अमरावती यांचे मार्फत शासनास सादर करावयाचा आहे.

तरी ग्रामपंचायत मुडाणा ता. महागाव चे विभागजन करुन साधुनगर येथे नविन ग्रामपंचायत स्थापन करणे बाबतचा प्रस्ताव दिनांक ३०/८/२०१४ चे जिल्हा परिषदेच्या स्थायी समिती समोर मा.अध्यक्ष जिल्हा परिषद, यवतमाळ यांचे अनुमतीने सादर करण्यांत येत आहे. प्रस्ताव स्थायी समितीचे मंजुरीस्तव सविनय सादर करण्यात येत आहे. **सदर विषयावर चर्चा होऊन मा. सभापती (स्थायी समिती) यांनी खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.**

**ठराव क्रं.७ :-** **शासन निर्णय क्रमांक /व्हीपीएम /२६०३/प्र.क्र.१५४४/ पंरा- ४(२२) दिनांक १२ फेब्रुवारी २००४ अन्वये यवतमाळ जिल्हयातील पंचायत समिती, महागांव अंतर्गत असलेल्या ग्रामपंचायतचे विभाजन करुन त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी नविन ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतच्या खालील प्रस्तावास ही सभा मंजुरी प्रदान करते.**

| अ.क्र. | सद्याच्या ग्रामपंचायतीचे नांव | | | प्रस्तावित ग्रामपंचायतीचे नांव | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सद्याच्या ग्रा.पं. चे नांव | समाविष्ठ महसुली गांवे | लोकसंख्या | प्रस्तावित ग्रा.पं.चे नांव | समाविष्ठ महसुली गांवे | लोकसंख्या | |
| १. | मुडाणा | मुडाणा | ३१६८ | मुडाणा | मुडाणा | ३१६८ | |
| | | नेहरुनगर | ८७२ | | नेहरुनगर | ८७२ | |
| | | साधुनगर | ११७७ | साधुनगर | साधुनगर | ११७७ | |

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)**यांनी यवतमाळ जिल्हयातील झरीजामणी,बाभुळगाव महागाव, राळेगाव, कळंब, व मारेगाव या सहा तालुका मुख्यालय असलेल्या ग्रा.प.ला म.शा. ग्रा. व जलसंधारण विभाग मुंबई यांचे पत्र क्र. झेडपीबी/२०१४/प्र.क्र.३९/परा-५/१४ दिनांक ३ मे २०१४ अन्वये ग्रामपंचायतीला नगर पंचायतीचा दर्जा देण्याचे प्रस्तावा बाबत विषय चर्चेला ठेवला असता **मा.अध्यक्ष तथा सभापती (स्थायी समिती)** यांनी सविस्तर प्रस्ताव तयार करुन पुढील होणा-या स्थायी समिती सभेसमोर ठेवण्याबाबतचे **निर्देश उप मु.का.अ.(पंचा) यांना दिले.**

<u>**विषय पत्रिकेवरील विषय संपल्यानंतर खालील प्रमाणे चर्चा घडून आली.**</u>

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी समायोजनाच्या प्रक्रियेमध्ये घाटंजीला मुख्याध्यापक अतिरिक्त झाले, व बी. ई.ओ. ने यादी समोर ठेवली असता मुख्याध्यापकाने यादी मधील सोयीचे असलेली गांवे घेतली असून या प्रक्रियेमध्ये बी .ई.ओ.ने फेरफार करून पैसे घेतलेले आहे. त्यामुळे याबाबत सखोल चौकशी करण्यात यावी तसेच घाटंजी बी.ई.ओ. हे वारंवार चुका करीत आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द या सभेमध्ये ठराव घेण्यात यावा व शासनाकडे पाठविण्यात यावा असे सांगितले.

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी वस्ती शाळेच्या शिक्षकांचा कालावधी कोणता धरण्यात येतो या बाबतची विचारणा केली असता **शि. अ. (प्राथ.)** यांनी सेवाजेष्ठता पाहण्यात येते असे सांगितले. त्याच प्रमाणे **सन्मा. सदस्य यांनी** शाळेच्या शिक्षकांना समायोजनामध्ये घेण्याची गरज नव्हती, तरी सुध्दा यवतमाळ पं.स. मधील वाघाडी शाळेतील श्री. प्रेमसिंग राठोड (शिक्षक) यांना समायोजनामध्ये घेण्यात आले आहे. तरी याची संपूर्ण चौकशी झाली पाहिजे असे सांगितले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा.अध्यक्ष तथा सभापती (स्थायी समिती)** यांनी वरील दोन्ही प्रकरणाची चौकशी करून शासनाकडे अहवाल पाठविण्या बाबतचे **निर्देश शि.अ.(प्राथ.) यांना दिले.**

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी घाटंजी तालुक्यामध्ये मौजा सकदा येथील जोडरस्त्याचे काम करण्यात येऊन केवळ तिन महिने झाले परंतु आज त्या रस्त्याने चालता सुध्दा येत नाही. त्यामुळे ठेकेदार व अभियंता यांची चौकशी करण्यात यावी कारण काम न करता पैसे काढण्यात आले असल्याचे सांगितले. त्यावर **मा. अध्यक्ष तथा सभापती (स्थायी समिती)** यांनी उक्त प्रकरणाची चौकशी करावी व सत्वर अहवाल सादर करण्याबाबत श्री. नितनवरे. कार्य.अभि. बांध. क्रं. २ यांना निर्देश दिले.

**सन्मा. सदस्य सौ. संगितताई अ.राजूरकर** यांनी २५ मे ला मोहदा शाळेचे टीनपत्रे उडाले अजूनपर्यंत दुरूस्तीचे पैसे दिले नसल्याचे सांगितले असता शि.अ.(प्राथ.) यांनी शाळेला पैसे दिलेले आहे असे सांगितले. **त्यावर मा.अध्यक्ष तथा सभापती (स्थायी समिती)** यांनी सदर शाळेला रुपये १ लाख ९० हजार देण्यात आले असल्याचे सांगितले.

**सन्मा. सदस्य श्री.अनिल भ.नरवाडे** यांनी दहन दफन निधीबाबत यादी आली काय याची विचारणा केली असता **मा.अध्यक्ष तथा सभापती (स्थायी समिती)** यांनी यादी आलेली आहे, परंतु ती उचित वाटत नसल्याचे सांगितले.

**सन्मा. सदस्य सौ. उमाताई वि.पिदुरकर** यांनी वणी तालुक्यामध्ये चिकणी येथे ७ वर्ग असुन, फक्त दोनच शिक्षक असल्याचे सांगितले. यावर **शि. अ. (प्राथ.)** यांनी तेथील शाळेत ३४ पटसंख्या असल्यामुळे तेथे शिक्षक देता येणार नाही असे सांगितले.

**सन्मा. सदस्य सौ. उमाताई वि.पिदुरकर** यांनी पुनवट येथील विहिरीच्या दुरूस्तीबाबत विचारणा केली असता श्री. उमाळकर का. अभि. (पा.पु.) यांनी आदेश दिलेले आहेत असे सांगून पाणी कमी झाल्यानंतर पुढील काम करणार आहे. तसेच पुनवट येथील गैरप्रकार झाल्यामुळे काळ्या यादीत नांव टाकलेले आहे असे सांगितले.

**मा.सभापती (महिला व बालकल्याण) समिती सौ. प्राजक्ताताई निमीष मानकर यांनी** मोहदा येथील पाणी पुरवठा इस्टीमेटचे काय झाले याची विचारणा केली असता **कार्य. अभि. (पापू)** श्री. उमाळकर यांनी ए. एल ऑफीसमधून त्रुटया आल्या होत्या, त्याची पूर्तता करून पुनश्च इस्टीमेट मंजूरीस्तव पाठविण्यात आले असल्याचे सांगितले. **त्यावर मा.अध्यक्ष तथा सभापती (स्थायी समिती)** यांनी पाणी पुरवठ्याच्या संदर्भात कार्यकारी अभियंता, (पा.पु.) यांना अधिकार आल्यामुळे आपल्या स्तरावरून जुने व नवे निर्णय घेण्यात यावे, असा ठराव या सभेमध्ये घेण्यात येत आहे असे सांगून आपल्या स्तरावरून रूंझा येथील पाणी पुरवठ्याबाबत चा निर्णय घेण्याबाबत कार्य. अभि. (पापू) यांना सांगितले.

**ठरावक्रं.८ :-** **पाणी पुरवठ्याच्या संदर्भात कार्यकारी अभियंता, (पा.पु.) यांना अधिकार आल्यामुळे जि.प. स्तरावरून जुने व नवे निर्णय घेण्यात यावे असी ही सभा ठरावा व्दारे मंजूरी प्रदान करते.**

विषय पत्रीकेवरील विषय व चर्चा संपल्यानंतर सभागृहाने कामकाजात भाग घेऊन सहकार्य केल्याबध्दल उपस्थितांचे आभार मानुन **मा. अध्यक्ष तथा सभापती (स्थायी समिती ) जि. प. यवतमाळ** यांचे परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे सचिवांनी जाहीर केले.

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**सचिव,**
**स्थायी समिती,**
**जि.प.यवतमाळ**

**सभापती,**
**स्थायी समिती**
**जि.प.यवतमाळ**